निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २८६ वा.
शनिवार :२० डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## प्राचीन ज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून भारत 'विश्वगुरू' बनू शकतो - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** प्राचीन भारत हा केवळ सांस्कृतिकदृष्ट्या नव्हे तर आर्थिक, शैक्षणिक आणि वैज्ञानिकदृष्ट्याही जगातील सर्वाधिक प्रगत देशांपैकी एक होता. भारतातील समृद्ध ज्ञानपरंपरा, विज्ञान, गणित, खगोलशास्त्र, तत्त्वज्ञान, आयुर्वेद, योग आणि सामाजिक मूल्यांमुळे देश जगाला दिशा देणारा ठरला होता. आज या प्राचीन ज्ञानाची आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाशी प्रभावी सांगड घालण्यात आली, तर भारत पुन्हा एकदा जागतिक पातळीवर 'विश्वगुरू' म्हणून उदयास येऊ शकतो, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

वांद्रे-कुर्ला संकुलातील ग्रँड हयात येथे आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर के पी ग्लोबलचे अध्यक्ष राजेश शर्मा, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक अध्यक्ष स्वामी विद्यानंद, जे.एस.डब्ल्यू. ग्रुपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल, आयटी मंत्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक शैलेश त्रिवेदी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

'इनव्हेशन, सेल्फ रिलायन्स अँड प्रोस्पेरिटी' (शोध, स्वावलंबन आणि समृद्धी) या देशाच्या भविष्यातील विकासदिशा ठरविणाऱ्या संकल्पनेवर या मंचावर सखोल मंथन होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, हिंदू ही केवळ एक धर्मव्यवस्था नसून ती जीवनपद्धती, मूल्यव्यवस्था आणि विचारप्रणाली आहे. हजारो वर्षांपासून ही परंपरा अखंडपणे सुरू असून अनेक प्राचीन संस्कृती काळाच्या ओघात लुप्त झाल्या असतानाही सिंधू-हिंदू संस्कृती आजही टिकून आहे. पुरातत्त्वीय आणि ऐतिहासिक पुराव्यांवरून हे सांस्कृतिक सातत्य किमान दहा हजार वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात असल्याचे स्पष्ट होते.

भारत हा नवनिर्मितीचा आणि संशोधनाचा मूळ स्रोत असल्याचे अधोरेखित करताना मुख्यमंत्री म्हणाले की, प्राचीन भारतात खगोलशास्त्र, गणित, भूगोल, वैद्यकशास्त्र आणि स्थापत्यशास्त्र अत्यंत प्रगत अवस्थेत होते.

वेद, उपनिषदे तसेच वेदपूर्व साहित्यामध्ये या ज्ञानाची स्पष्ट साक्ष आढळते. आज जग पाचव्या औद्योगिक क्रांतीच्या उंबरठ्यावर उभे असून ही क्रांती डिजिटायझेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा ॲनालिटिक्स आणि ऑटोमेशनच्या जोरावर आकार घेत आहे. या बदलत्या काळात उत्पादन क्षेत्राला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून उत्पादन हेच कोणत्याही अर्थव्यवस्थेचे कणा असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, इनोव्हेशनचे मूळ उत्पादन क्षेत्रात आहे. नव्या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून उत्पादनक्षमता वाढवणे आणि जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक राहणे अत्यंत आवश्यक आहे. पाचव्या औद्योगिक क्रांतीचे नेतृत्व करण्याची क्षमता भारताकडे असून युवा लोकसंख्या, कुशल मनुष्यबळ आणि वाढती डिजिटल पायाभूत सुविधा ही भारताची मोठी ताकद आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा क्षेत्रात भारत आघाडीवर असल्याचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले की, मायक्रोसॉफ्टचे प्रमुख सत्य नाडेला यांनी २०३० पर्यंत जगातील सर्वाधिक डेव्हलपर्स भारतीय असतील, असे भाकीत केले आहे. एआयमुळे उद्योग, शिक्षण, आरोग्य, शेती आणि सेवा




क्षेत्रात आमूलाग्र बदल घडत असून या बदलांचे नेतृत्व करण्याची क्षमता भारताकडे आहे.

'आत्मनिर्भर भारत' या प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या संकल्पनेचा संदर्भ देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, १४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशाने आत्मनिर्भर होणे ही काळाची गरज आहे. स्वदेशी उत्पादनाला चालना देणे, भारतीय कंपन्यांमार्फत संशोधन व तंत्रज्ञान विकास करणे आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करणे हे आत्मनिर्भरतेचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. चीनने इतर देशांचे तंत्रज्ञान वापरून रिव्हर्स इंजिनिअरिंगच्या माध्यमातून प्रगती केली; मात्र भारताकडे तंत्रज्ञान समजून घेऊन स्वतःची प्रणाली विकसित करण्याची क्षमता आहे. याच दृष्टिकोनातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विविध क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञान हस्तांतरणाची अट घातली असल्याचे त्यांनी सांगितले.

जगातील बदलत्या भू-राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना मुख्यमंत्री म्हणाले की, चीनच्या विस्तारवादी धोरणांमुळे जागतिक स्तरावर त्याच्यावरील विश्वास कमी होत आहे. याउलट भारताच्या नेतृत्वावर, लोकशाही मूल्यांवर आणि सांस्कृतिक समन्वयावर जगाचा विश्वास वाढत आहे. आफ्रिकेमध्ये विकासाच्या मोठ्या संधी असून, जो देश त्या संधींमध्ये सक्रिय सहभाग घेईल, तोच भविष्यात जागतिक नेतृत्व करेल. भारत आणि आफ्रिकी देशांमधील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संबंध दृढ असून अनेक आफ्रिकी देश प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना आपला मार्गदर्शक नेता मानतात.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी माहिती दिली की, मुंबईत लवकरच ५४ आफ्रिकी देशांना एकत्रितपणे होस्ट करणारी भव्य इमारत उभारली जाणार आहे. यामुळे भारत-आफ्रिका संबंधांना नवी दिशा मिळेल. भारतीय उद्योजकांनी आफ्रिकेकडे लक्ष केंद्रित करण्याची गरज असून आफ्रिकेमध्ये प्रचंड नैसर्गिक साधनसंपत्ती आणि नव्या तंत्रज्ञानासाठी आवश्यक कच्चा माल उपलब्ध आहे. आफ्रिकेत उत्पादन सुरू झाल्यास जागतिक अर्थव्यवस्थेत मोठा बदल घडेल आणि त्याचे नेतृत्व भारत करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.पापुआ न्यू गिनीच्या शिष्टमंडळाने गॅस उत्खननासाठी भारताला दिलेल्या निमंत्रणाचा उल्लेख करत मुख्यमंत्री म्हणाले की, या सर्व संधी भारताच्या प्राचीन जागतिक दृष्टिकोनातून उद्भवल्या आहेत. विचारांच्या बळावर जग जिंकण्याची परंपरा भारताची आहे. विविध देशांना एकत्र आणण्याचे आणि संवाद घडवून आणण्याचे काम वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसारखे मंच प्रभावीपणे करू शकतात. जागतिक व्यापारात २० टक्के वाटा मिळवण्याचे स्वप्नही या व्यापक दृष्टिकोनातून साकार होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

दरम्यान,सिमेंटच्या बांगर ग्रुपने महाराष्ट्रातील चंद्रपूर येथे २,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यासाठीचे 'इंटेंट लेटर' मुख्यमंत्री फडणवीस यांना मंचावर सादर केले. ही गुंतवणूक म्हणजे राज्याच्या औद्योगिक विकासावर आणि धोरणात्मक स्थैर्यावर दाखवलेला विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी स्वामी विद्यानंद म्हणाले की, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचा प्रमुख उद्देश देशाचा सर्वांगीण विकास हा आहे. देशातील प्रत्येक नागरिक आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला, तरच खऱ्या अर्थाने विकास साध्य होईल. यासाठी सर्व स्तरांवरील घटकांनी आर्थिक विकास प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे.के पी ग्लोबलचे अध्यक्ष राजेश शर्मा यांनी सांगितले की, जागतिक अर्थव्यवस्थेत भारताची भूमिका भविष्यात अत्यंत निर्णायक ठरणार आहे. भारतात नवसंकल्पना मोठ्या प्रमाणावर विकसित होत असून उत्पादन आणि निर्मिती क्षेत्रातही भारत आघाडी घेत आहे.

जे.एस.डब्ल्यू. ग्रुपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल म्हणाले की, महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक प्रगत आणि उद्योगस्नेही राज्य आहे. डावोस येथे झालेल्या ३ लाख कोटी रुपयांच्या सामंजस्य करारांची अंमलबजावणी प्रत्यक्षात सुरू असून त्याचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाला जाते. या कार्यक्रमास देशभरातील विविध शहरांमधील उद्योजक, उद्योगपती आणि तज्ज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### राज्यातील २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी उद्या मतदान

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यातील २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्ष व सदस्यपदांसाठी तसेच विविध नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील १४३ सदस्यपदांच्या रिक्त जागांसाठी शनिवार, २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. या सर्व निवडणुकांची मतमोजणी रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात येणार आहे.राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील एकूण २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर केला होता. त्यानुसार २ डिसेंबर २०२५ रोजी २६३ नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान प्रक्रिया पार पडली होती.उर्वरित २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी उद्या मतदान होणार असून, सर्व संबंधित ठिकाणी २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणीस सुरुवात होईल, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाने दिली आहे.

### बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांसाठी 'दिशा' अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी बंधनकारक - सचिव तुकाराम मुंढे

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गुणवत्ता, एकसमानता आणि सातत्य आणण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील विशेष शाळांमधील बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या 'दिशा' विशेष अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सर्व बौद्धिक अक्षम प्रवर्गाच्या विशेष शाळांमध्ये दिशा पोर्टल, अभ्यासक्रम व मूल्यमापन प्रणाली राबविणे बंधनकारक असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.सचिव मुंढे म्हणाले, सर्व विशेष शाळांना 'दिशा' पोर्टलवर ऑनबोर्ड करणे, मुख्याध्यापक व शिक्षकांचे प्रशिक्षण, प्रत्येक विद्यार्थ्यासाठी वैयक्तिक शिक्षण कार्यक्रम (आयईपी) व वैयक्तिक थेरपी कार्यक्रम (आयटीपी) तयार करणे, बहुसंवेदी अध्यापन पद्धतीचा अवलंब करणे तसेच नियमित मूल्यमापन व पुनरावलोकन करणे आवश्यक आहे.

## महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा भरारी पथकांची स्थापना करावी - राज्य निवडणूक आयुक्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/**महानगरपालिका निवडणुका सुरळीतपणे पार पाडण्याकरिता आणि आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुरेशा भरारी पथकांची स्थापना करावी. त्याचबरोबर सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कार्यालये सुसज्ज ठेवावीत आणि मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे, यादृष्टीने आतापासूनच काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणूक प्रक्रियेच्या तयारीसंदर्भात सर्व महानगरपालिका आयुक्तांची आज दूरचित्र संवादाच्या माध्यमातून बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांच्यासह आयोगातील विविध अधिकारी यावेळी उपस्थित होते.

दिनेश वाघमारे यांनी सांगितले की, भरारी पथकांच्या माध्यमांतून आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यासाठी महानगरपालिका आयुक्तांनी पुरेशा मनुष्यबळाची व्यवस्था करावी; तसेच कायदा व सुव्यवस्था चोख राखण्यासाठी पोलीस यंत्रणेसोबत समन्वय साधावा. त्याचबरोबर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात संबंधित प्रभागांचे नकाशे, प्रभागातील जागानिहाय आरक्षण, नामनिर्देशनपत्र व शपथपत्राचे नमुने, इतर आवश्यक अधिकारी/ कर्मचारी, आवश्यक साहित्य इत्यादींची त्वरित व्यवस्था करण्यात यावी. मतदारांना सहज व सुलभरित्या मतदान करता यावे, यासाठी मतदान केंद्रांवर किमान सेवा-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. शक्य असलेल्या ठिकाणी आदर्श मतदान केंद्रे किंवा पिंक मतदान केंद्रांची उभारणी करावी.

सचिव काकाणी यांनी बैठकीत सादरीकरण केले. महानगरपालिकेसंदर्भातील अधिनियम व राज्य निवडणूक आयोगाचे विविध आदेश यासंदर्भात त्यांनी तपशीलवार माहिती दिली. ते म्हणाले की, उमेदवारांच्या यादीतील आणि मतपत्रिकांवरील उमेदवारांच्या नावांचा क्रम राज्य शासनाने महानगरपालिका निवडणूक नियमात केलेल्या सुधारणेनुसार लावावा. निवडणूक चिन्ह वाटपासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाच्या ५ मे २०२५ रोजीच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे. या सर्व निवडणूक प्रक्रियेसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, याकरिता महानगरपालिका आयुक्त यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधावा.

## दृष्टिबाधित खेळाडूंना राज्य सरकारकडून सर्वतोपरी मदत करण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** भारताच्या दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेट संघाने जागतिक पातळीवर ऐतिहासिक कामगिरी करत अजिंक्यपद पटकावल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीममधील खेळाडूंचा सत्कार केला. महिला खेळाडूंना त्यांच्या सरावात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी व त्यांना आर्थिक सहाय्य, रोजगाराच्या संधी आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी मदत करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.मुख्यमंत्री यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमात विश्वविजेत्या संघातील खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

यावेळी क्रीडा व युवक कल्याण आयुक्त शीतल तेली उगले, संघाच्या कर्णधार दीपिका टी.सी., उपकर्णधार व महाराष्ट्राची खेळाडू गंगा कदम, क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाईंड इन इंडियाचे चेअरमन के. जी. महंतेश, क्रीडा विभागाचे उपसचिव सुनील पांढरे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांच्यासह संघातील खेळाडू उपस्थित होते.



या खेळाडूंनी भारताचे नाव जागतिक पातळीवर उज्ज्वल केले असून तिरंग्याचा सन्मान वाढवला आहे, असे गौरवोद्गार काढून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघ अपराजित राहिला.

अंतिम सामन्यात निर्णायक विजय मिळवत भारतीय मुलींनी दृष्टिबाधित क्रिकेटमधील आपले वर्चस्व सिद्ध केले. या विजयामुळे देशभर आनंदाचे वातावरण असून इतिहासात दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेटचे पहिले चॅम्पियन म्हणून भारताचे नाव कोरले गेले आहे. इतिहासात या विजयाची नोंद होईल. या यशामागे खेळाडूंनी घेतलेले अपार कष्ट, सातत्यपूर्ण सराव आणि अनेक अडचणींवर मात करण्याची जिद्द आहे. प्रत्येक खेळाडूची स्वतःची संघर्षकथा असून प्रतिकूल परिस्थितीतही हार न मानता त्यांनी सराव सुरू ठेवला. कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती हे वाक्य या संघाने प्रत्यक्षात उतरवले आहे.

संघाच्या वतीने मांडण्यात आलेल्या अडचणी लक्षात घेऊन राज्य सरकार सर्वतोपरी मदत करेल. तसेच खेळाडूंना सरावासाठी स्वतंत्र आणि कायमस्वरूपी मैदान व इतर सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत क्रीडा आयुक्तांमार्फत चर्चा करून योग्य कार्यवाही केली जाईल. कोणतीही आर्थिक किंवा कौटुंबिक अडचण खेळातील प्रगतीस अडथळा ठरू नये, यासाठी लागेल ती मदत करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

देशात खेळ आणि खेळाडूंना मिळणारे महत्त्व वाढत आहे. पूर्वी खेळाला करिअर म्हणून कमी महत्त्व दिले जात होते; मात्र आता ही मानसिकता बदलत असल्याचे मत फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गंगा कदम महाराष्ट्राची लेक असली, तरी येथे उपस्थित असलेल्या सर्व खेळाडू भारताच्या लेकी आहेत.

त्यामुळे सर्व खेळाडूंना मदतीसाठी सहकार्य करू.यावेळी क्रीडा आयुक्त श्रीमती तेली-उगले यांनी प्रास्ताविकात दृष्टिबाधित खेळाडूंनी दाखविलेल्या दुर्दम्य इच्छाशक्ती व मेहनतीचा उल्लेख करून या खेळाडूंचा अभिमान असल्याचे सांगितले.

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेसाठी शाळांना नोंदणी करण्याचे सविस्तर आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस/मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांचे शैक्षणिक सातत्य टिकवून ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. त्याच अनुषंगाने विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज), इतर मागास वर्ग (इमाव) तसेच विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र) या प्रवर्गातील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती व गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन पद्धतीने महाडीबीटी (MahaDBT) प्रणालीद्वारे राबविण्यात येणार आहेत.या पार्श्वभूमीवर मुंबई शहर जिल्ह्यातील सर्व शाळांनी या योजनांच्या अंमलबजावणीसाठी महाडीबीटी पोर्टलवर आवश्यक ती नोंदणी करणे व शाळेशी संबंधित सर्व माहिती वेळेत आणि अचूकपणे अद्ययावत करणे अत्यावश्यक आहे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक रविकिरण पाटील यांनी केले आहे.या शिष्यवृत्ती योजनांसाठी शाळा स्तरावर मुख्याध्यापकांनी महाडीबीटी पोर्टलवरील https://prematric.mahait.org/Login/Login या संकेतस्थळावर लॉगिन करून शाळेची नोंदणी करणे बंधनकारक आहे. प्री-मॅट्रिक योजनांसाठी अर्ज नोंदणी करताना मुख्याध्यापकांनी Preš SE27XXXXXXXXXšPrincipal हा युजर आयडी व झरीी१२३ हा प्रारंभिक पासवर्ड वापरून लॉगिन करावे. लॉगिननंतर शाळेचे संपूर्ण प्रोफाइल, मुख्याध्यापकांची माहिती, लिपिक व संबंधित कर्मचाऱ्यांची माहिती तसेच विद्यार्थ्यांची वैयक्तिक, सामाजिक व शैक्षणिक माहिती काळजीपूर्वक तपासून अद्ययावत करणे आवश्यक आहे.विद्यार्थी ज्या शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र आहेत, त्या संबंधित योजनेसाठी अर्ज नोंदणी करण्यात यावी. अर्ज भरताना विद्यार्थ्यांचे नाव, जन्मतारीख, जात प्रवर्ग, आधार क्रमांक, बँक खाते तपशील, शैक्षणिक माहिती इत्यादी बाबी अचूक भरणे अत्यंत महत्त्वाचे आहे. चुकीची किंवा अपूर्ण माहिती भरल्यास अर्ज नामंजूर होण्याची शक्यता असल्याने शाळा प्रशासनाने याकडे विशेष लक्ष द्यावे.अर्ज प्रक्रियेदरम्यान महाडीबीटी पोर्टलवर तांत्रिक अडचणी, लॉगिन संदर्भातील समस्या किंवा इतर कोणतीही अडचण उद्भवल्यास संबंधितांनी ती लेखी स्वरूपात कळवावी अथवा ast-dirmumcityvintgmail.com या ई-मेल पत्त्यावर संपर्क साधावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.मुंबई शहर जिल्ह्यातील सर्व शाळांमधील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती योजनांचा पूर्ण लाभ मिळावा, यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक व शाळा कर्मचारी यांनी विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांना योग्य मार्गदर्शन करावे. अर्ज भरण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, अंतिम मुदती याबाबत विद्यार्थ्यांना व पालकांना वेळोवेळी माहिती देऊन अर्ज प्रक्रिया नियोजित कालावधीत पूर्ण करून घ्यावी.एकही पात्र विद्यार्थी केवळ माहितीअभावी, तांत्रिक अडचणीमुळे किंवा मार्गदर्शनाच्या अभावामुळे या महत्त्वाच्या शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहू नये, याची दक्षता घेण्याचे निर्देशही प्रसिद्धी पत्रकात देण्यात आले आहेत.

# शेतकरी जन्मासच येवू नये?

शेतकरी जन्मासच येवू नये? असेच घडत आहे आज. एक असंच प्रकरण. त्या प्रकरणात चंद्रपूर जिल्ह्यातील मिंथूर या गावातील एका रोशन खुळे नावाच्या व्यक्तीला आपली स्वतःची किडनी विकावी लागली. कारण त्यानं कर्ज घेतलं होतं अवैध सावकाराकडून. त्यानंतर सावकारांनी तकादा लावला होता कर्जफेड करण्यासाठी. ज्यातून त्याचं ट्रॅक्टरच नाही तर तीन एकर शेतीही गेली असं ऐकिवात आहे.

शेतकरी...... म्हणतात की शेतकरी जगाचा पोशिंदा. तो नसेल तर संपुर्ण मानवजित जीवंतच राहू शकणार नाही. याच धोरणातून पुर्वी बारा बलुतेदाराची निर्मिती झाली. ज्यातून जाती उदयाला आल्या. त्यानंतर सत्तावीस अनुतेदाराची निर्मिती झाली. पुर्वी बारा बलुतेदार निर्माण झाले व याच बारा बलुतेदारांनी गाव स्वयंपूर्ण ठेवलं. गावातील पिकलेलं धान्य हे गावातच विकण्याची नव्हे तर देण्याची पद्धती. पैसा हा व्यवहाराचं साधन नव्हतंच पुर्वी. त्यातच गावात जी बारा बलुतेदाराची पद्धती निर्माण झाली. त्या बलुतेदारात सुतार, लोहार, कुंभार, सोनार, न्हावी (केशकर्तन), धोबी (परीट), चांभार, महार, मांग, कोळी, गुरव आणि जोशी यांचा समावेश होता. ही सर्व मंडळी गावाची सेवा करीत असत. तेव्हा शेती हा व्यवसाय नसेल. अन् असेल तर तो व्यवसाय सर्वच समाजातील लोकं करीत असतील. मात्र ही सर्व मंडळी एकमेकांवर अवलंबून होती. समजा एखाद्या सोनाराला चप्पल लागली तर चांभार त्याला चप्पल देत असे आणि सोनार त्या चपलेच्या बदल्यात दागदागीने अर्थात अलंकार. तसंच गुरव हा मंदीराची देखभाल करायचा. त्या बदल्यात संपूर्ण गावातील इतर बलुतेदार त्याला ते बनवत असलेल्या वस्तू देत. जसे चांभार चप्पल, सोनार अलंकार, सुतार घर बांधून देणे, लोहार लोखंडाच्या वस्तू पुरविणे, न्हावी केश कापून देणे, परीट कपडे धुवून देणे, कोळी पाणीपुरवठा करणे, तर जोशी भविष्य सांगणे. इत्यादी. परंतु या कुणाचाही शेऔईशी संबंध नव्हता. म्हणून शेती संबंधीत अनुतेदाराची निर्मिती झाली. ज्या अनुतेदारात सुतार, लोहार, कुंभार, सोनार, न्हावी (केशकर्तन), धोबी (परीट), चांभार, महार, मांग, कोळी, गुरव आणि जोशी यांचा समावेश होता. ही सर्व मंडळी गावाची सेवा करीत असत. काही गावात बलुतेदार वेगवेगळे होते व त्यात वरील यादीतील काही जाती वगळून त्यात मातंग, खाटीक, तेली, कुंभार, माळी या जातींचा समावेश केला होता. तेव्हाही शेती हा व्यवसाय होता आणि शेती हा व्यवसाय सर्व गावकरी मिळून करीत असत. त्यानंतर त्या शेती व्यवसायाचं विकेंद्रीकरण एका विशिष्ट वर्गाला देण्यात आलं. ज्यावरुन त्याची जात बनविण्यात आली व ती कुणबी ठरवी. त्यातच त्याच्या काही पोटजाती पाडण्यात आल्या व त्यात माळी आणि तेली शिरवण्यात आले.

ते गाव स्वयंपुर्ण असायचं. कारण गावात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर जर संकट आलंच तर त्याच गावातील इतर मंडळी त्याला मदत करीत असत. मग तो शेतकरी का असेना. ज्यात कर्जाची भुमिका नव्हतीच आणि स्वार्थ नसल्यानं अशा गावातील लोकं एकमेकांशी गुण्या गोविंदानं राहात. म्हणूनच गाव स्वावलंबी आणि स्वयंपुर्ण होतं. याच बारा बलुतेदारांनी पुढे शेती सोडून इतर कामावर आधारीत अठरा अनुतेदारांची निर्मिती केली. काहींनी सत्तावीस अनुतेदार निर्माण केले. पर्यायानं सांगायचं झाल्यास अर्थातच प्रत्येक गावानं आपल्या आपल्या गरजेनुसार व सोयीनुसार वेग-वेगळे अनुतेदार व बलुतेदार निर्माण केले. ज्यात अनुतेदार व बलुतेदारांची संख्या वेगवेगळी होती. ज्यातून शेती व्यवसाय सर्वच समाजातील लोकं करीत असले तरी त्यात तद्नंतरबदल झाले व शेती ही विशिष्ट वर्गाला मिळाली.

काळ हळूहळू ओसरला व बदलत्या काळानुसार काळानं कळवट घेतली. ज्यातून गावात स्वार्थ शिरला. एकमेकांची मदत करणं बंद झाली. गाव स्वयंपुर्ण राहिलं नाही. पैसा विनिमयाची पद्धत आली. व्याज, कर्ज हे प्रकार आले व जे स्वयंपुर्ण गाव हचतं. त्या गावाची ऐशीतैशी झाली. तो काळ व त्या काळातील ही सर्व मंडळी एकमेकांवर अवलंबून होती. समजा एखाद्या सोनाराला चप्पल लागली तर चांभार त्याला चप्पल देत असे आणि सोनार त्या चपलेच्या बदल्यात दागदागीने अर्थात अलंकार. तसंच गुरव हा मंदीराची देखभाल करायचा.

# मार्टिन लूथर किंग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक न्यायाचा संघर्ष

१९ डिसेंबर हा दिवस सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि समानतेसाठी झटणाऱ्या विचारपरंपरेची आठवण करून देणारा दिवस आहे. या दिवशी जन्मलेले मार्टिन लूथर किंग सीनियर हे अमेरिकेतील वर्णद्वेषविरोधी लढ्याचे नैतिक अधिष्ठान मानले जातात. दुसरीकडे, भारतीय समाजव्यवस्थेतील जातीआधारित विषमतेविरुद्ध आयुष्यभर संघर्ष करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताच्या सामाजिक न्यायाच्या विचारांचे शिल्पकार ठरले. भौगोलिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या भिन्न असलेल्या या दोन महान व्यक्तिमत्त्वांचे जीवनकार्य समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले असता, त्यांच्यातील साम्य अधिक ठळकपणे समोर येते.

दोघांनीही वेगवेगळ्या सामाजिक संरचनांमध्ये जन्म घेतला, परंतु दोघांच्याही संघर्षाचे मूळ एकच होते. मानवी प्रतिष्ठेचा अपमान करणाऱ्या अन्यायकारक सामाजिक व्यवस्थेचा निःसंकोच प्रतिकार करणे.

अमेरिकेतील कृष्णवर्णीय समाज आणि भारतातील दलित समाज, या दोन्ही समुदायांचा इतिहास दडपशाही, वंचना आणि अपमानाने भरलेला आहे. अमेरिकेत गुलामगिरी, वर्णभेद आणि विभक्तीकरणाच्या धोरणांमुळे कृष्णवर्णीय समाजाला शिक्षण, रोजगार, निवास आणि राजकीय हक्कांपासून दूर ठेवण्यात आले होते. भारतात जातिव्यवस्थेने दलित समाजाला अस्पृश्यतेच्या नावाखाली सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक आयुष्यापासून बहिष्कृत केले. समाजशास्त्र सांगते की अशा प्रकारची विषमता ही केवळ वैयक्तिक पूर्वग्रहांमुळे निर्माण होत नाही, तर ती संपूर्ण सामाजिक रचनेतून, परंपरा, कायदे आणि सत्तासंबंध यांमधून घडवली जाते. किंग सीनियर आणि आंबेडकर दोघांनीही ही संरचनात्मक विषमता ओळखली आणि तिच्या मुळावर प्रहार करण्याचा प्रयत्न केला.

मार्टिन लूथर किंग सीनियर हे धर्मोपदेशक होते. त्यांनी चर्च या संस्थेला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनवले. चर्चमधून त्यांनी आत्मसन्मान, समता आणि नैतिकतेचे संदेश दिले. त्यांच्या मते धर्म हा केवळ वैयक्तिक मोक्षाचा मार्ग नसून तो सामाजिक न्यायाचा आधार असला पाहिजे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, त्यांनी धर्माचा वापर 'सामाजिक एकजूट' आणि 'नैतिक दबाव' निर्माण करण्यासाठी केला. त्याउलट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्माकडे अत्यंत चिकित्सक दृष्टीने पाहिले. त्यांनी हिंदू समाजातील जातिव्यवस्थेचे धार्मिक समर्थन उघडपणे नाकारले आणि धर्मग्रंथांवर आधारित अन्यायाला आव्हान दिले. त्यांनी कायदा, संविधान आणि राजकीय अधिकार यांना सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या दोघांच्या मार्गांमध्ये फरक असला, तरी त्यांचा उद्देश एकच होता तो म्हणजे दडपल्या गेलेल्या समाजाला आत्मसन्मान आणि हक्क मिळवून देणे.

शिक्षण हे सामाजिक मुक्तीचे साधन आहे, यावर दोघांचाही ठाम विश्वास होता. किंग सीनियर यांनी कृष्णवर्णीय समाजात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आणि चर्चच्या माध्यमातून बौद्धिक जागृती घडवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तर शिक्षणालाच सामाजिक क्रांतीचे मुख्य शस्त्र मानले. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा संदेश समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, सामाजिक चळवळीची मूलभूत सूत्रे मांडणारा होता. शिक्षणामुळे व्यक्तीला केवळ ज्ञान मिळत नाही, तर ती सामाजिक रचनेतील अन्याय ओळखण्याची क्षमता प्राप्त करते, हे दोघांनाही स्पष्टपणे जाणवले होते.

अहिंसा आणि नैतिक प्रतिकार हा किंग सीनियर यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यांनी हिंसेपेक्षा नैतिक बळ अधिक प्रभावी ठरते, असा विश्वास समाजात रुजवला. समाजशास्त्रात अहिंसा ही 'नैतिक वर्चस्व' निर्माण करण्याची प्रक्रिया मानली जाते, जी सत्ताधाऱ्यांवर दबाव टाकते. बाबासाहेब आंबेडकर यांचा मार्ग मात्र अधिक संघर्षात्मक होता. त्यांनी शांततापूर्ण आंदोलनांसोबतच तीव्र शब्दांत सामाजिक व्यवस्थेवर टीका केली. त्यांनी कायदेशीर लढा, आंदोलन आणि राजकीय सहभाग यांचा मार्ग स्वीकारला. तरीही, दोघांचाही उद्देश हिंसक अराजक नव्हता, तर न्याय्य आणि सन्मानजनक समाजनिर्मिती हाच होता.

कुटुंब आणि समाजीकरणाच्या प्रक्रियेलाही दोघांनी महत्त्व दिले. किंग सीनियर यांनी आपल्या कुटुंबातूनच समतेचे, नैतिकतेचे आणि सामाजिक जबाबदारीचे संस्कार रुजवले. समाजशास्त्रात कुटुंब ही प्राथमिक समाजीकरणाची संस्था मानली जाते, आणि त्यांच्या कुटुंबातून पुढे जागतिक स्तरावरील नेतृत्व घडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैयक्तिक आयुष्य संघर्षाने भरलेले असले, तरी त्यांनी समाजाला नवे संस्कार देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी दलित समाजाला आत्मगौरव, संघटन आणि राजकीय जागृतीची दिशा दिली.

दोघांच्याही संघर्षात संघटनाला अनन्यसाधारण महत्त्व होते. किंग सीनियर यांनी विविध धार्मिक आणि सामाजिक गटांना एकत्र आणून सामाजिक भांडवल निर्माण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजाला संघटित करून त्यांना राजकीय शक्तीची जाणीव करून दिली. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, संघटन हीच सामाजिक परिवर्तनाची खरी ताकद असते. एकटा व्यक्ती अन्यायाविरुद्ध उभा राहू शकतो, पण संघटित समाजच परिवर्तन घडवू शकतो, हा संदेश दोघांनीही आपल्या कृतीतून दिला.

आजच्या जागतिक आणि भारतीय संदर्भात किंग सीनियर आणि आंबेडकर यांचे विचार अधिकच समर्पक वाटतात. आजही जगभरात वंश, जात, धर्म, लिंग आणि वर्ग यांच्या आधारावर भेदभाव अस्तित्वात आहे. कायदे आणि संविधान असूनही सामाजिक विषमता पूर्णतः नष्ट झालेली नाही. समाजशास्त्र सांगते की अशा परिस्थितीत मूल्यपरिवर्तन आणि नैतिक नेतृत्व अत्यंत आवश्यक असते. किंग सीनियर यांचा नैतिकतेवर आधारित संघर्ष आणि आंबेडकर यांचा कायदेशीर व बौद्धिक लढा, हे दोन्ही मार्ग आजच्या समाजाला दिशा देऊ शकतात.

१९ डिसेंबर रोजी मार्टिन लूथर किंग सीनियर यांच्या जयंतीनिमित्त, त्यांच्या विचारांचा विचार करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाच्या संघर्षाशी त्यांची तुलना करणे अत्यंत अर्थपूर्ण ठरते.

दोघांनीही वेगवेगळ्या देशांत, वेगवेगळ्या सामाजिक वास्तवांतून एकच संदेश दिला तो म्हणजे माणूस म्हणून माणसाला समान हक्क आणि समान सन्मान मिळालाच पाहिजे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, हे दोन्ही विचारवंत केवळ इतिहासातील व्यक्ती नाहीत, तर ते आजही जिवंत असलेले सामाजिक विचार आहेत.

शेवटी, मार्टिन लूथर किंग सीनियर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य हे मानवी प्रतिष्ठेच्या संरक्षणासाठी चाललेल्या जागतिक संघर्षाचे प्रतीक आहे. दोन खंडांमध्ये जन्मलेले, दोन वेगवेगळ्या समाजव्यवस्थांशी झुंज देणारे हे नेते एकाच ध्येयासाठी उभे राहिले ते ध्येय म्हणजे न्याय, समता आणि बंधुता होय. त्यांच्या विचारांचा वारसा स्वीकारणे म्हणजे केवळ स्मरण करणे नव्हे, तर त्यांच्या मूल्यांना आपल्या सामाजिक आचरणात उतरवणे होय. कारण समाज टिकवायचा असेल, तर तो न्यायावर आणि मानवी प्रतिष्ठेवरच उभा राहिला पाहिजे, आणि हीच शिकवण किंग सीनियर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर दोघांनीही मानवजातीला दिली आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# राज्यातील पहिल्या 'जेन जी' पोस्ट ऑफिसचे लोकार्पण

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई / प्रतिनिधी**/ 'जेन जी' तरुणाईला केंद्रस्थानी ठेवून भारतीय टपाल विभागाने मुंबईतील आयआयटी मुंबई येथे राज्यातील पहिले 'जेन जी' पोस्ट ऑफिस सुरू केले आहे. 'जेन जी' थीमवर आधारित हे महाराष्ट्रातील पहिलेच टपाल कार्यालय असून, डिजिटल युगातील तरुण, विद्यार्थी आणि तंत्रज्ञानस्नेही नागरिकांसाठी ते खास डिझाइन करण्यात आले आहे. आधुनिक, अनुभवप्रधान आणि पूर्णतः डिजिटल स्वरूपाचे हे पोस्ट ऑफिस टपाल सेवांना नव्या पिढीशी जोडण्याचा अभिनव प्रयत्न आहे.यापूर्वी दिल्ली, केरळ, गुजरात, बिहार आणि आंध्रप्रदेशात 'जेन जी' पोस्ट ऑफिस सुरू झाल्यानंतर आता मुंबईत हा उपक्रम राबवण्यात आला आहे. महाराष्ट्र व गोवा परिमंडळाचे मुख्य पोस्टमास्तर जनरल अमिताभ सिंह यांच्या हस्ते या पोस्ट ऑफिसचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी मुंबई विभागाच्या टपाल सेवा संचालिका कैया अरोरा, आयआयटी मुंबईचे संचालक प्रा. शिरीष केदारे, कुलसचिव गणेश भोर्कदे, तसेच इंडिया पोस्ट आणि आयआयटी मुंबईचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या पोस्ट ऑफिसची अंतर्गत रचना, भित्तीचित्रे आणि सजावट भारतीय टपाल विभागाच्या इन-हाऊस टीमने आयआयटी बॉम्बेच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने साकारली आहे. युवक-केंद्रित, आकर्षक वातावरणात टपाल सेवा देण्याचा हा एक नवा प्रयोग आहे.'जेन जी' पोस्ट ऑफिसमध्ये मोफत वाय-फाय, कॅफेटेरिया, स्टायलिश बसण्याची सोय, मिनी लायब्ररी, संगीत कोपरा, पार्सल व लॉजिस्टिक सेवांची माहिती देणारा 'पार्सल ज्ञान पोस्ट', क्यूआर-आधारित सेवा, आधार सुविधा तसेच पोस्ट ऑफिस सेव्हिंग्स बँक योजनांबाबत मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




विद्यार्थ्यांना स्पीड पोस्ट सेवांवर १० टक्के, तर बल्क बुकिंगवर ५ टक्के सवलत देण्यात येईल.पोस्ट ऑफिस केवळ व्यवहारांचे ठिकाण न ठेवता, युवकांसाठी संवादात्मक व अनुभवप्रधान कम्युनिटी स्पेस म्हणून विकसित करण्याचा हा उपक्रम असल्याचे भारतीय टपाल विभागाने स्पष्ट केले. परंपरा आणि नवोन्मेष यांचा संगम साधत टपाल सेवांना नव्या पिढीशी जोडण्याचा हा प्रयत्न असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# आमदार दांपत्याच्या भावनिक व वास्तववादी सादेमुळे धर्माबाद पुन्हा भाजपामय

**आत्ताच एक्सप्रेस**
**धर्माबाद (प्रतिनिधी)**
धर्माबाद नगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच आमदार राजेश पवार यांच्या पुढाकारातून सुरू झालेला विकास सुनियोजित कटांमुळे कसा थांबू शकतो, तसेच त्याचा सर्व जाती-धर्मांच्या सामाजिक व कौटुंबिक रचनेवर कसा परिणाम होऊ शकतो, याचे वास्तववादी चित्र आमदार राजेश पवार आणि त्यांच्या पत्नी सौ. पुनमताई पवार यांनी थेट जनतेसमोर मांडले आहे.आमदार दांपत्याने धर्माबाद नगरपालिकेतील सर्व प्रभागांतील वस्त्या-वस्त्यांमध्ये भेटी देत मतदारांशी थेट संवाद साधला. भावनिक पण वास्तवावर आधारित साद घालत त्यांनी भविष्यातील संभाव्य धोके जनतेसमोर उलगडून सांगितले. या आवाहनामुळे मतदार खडबडून जागे झाल्याचे चित्र सध्या शहरात दिसून येत आहे.

आजवर सर्वसामान्य नागरिकांना बाजूला ठेवून वरच्या पातळीवर राजकारण होत असल्याची भावना होती. मात्र आमदार राजेश पवार यांनी या परंपरेला छेद देत प्रत्यक्ष विकासकामांना गती दिली, हे शहरातील नागरिकांनी अनुभवले आहे. अशा परिस्थितीतच नगरपालिका निवडणूक जाहीर झाली आणि आमदार पवार यांच्या विरोधात सुनियोजित राजकीय डावपेच राबविण्यात आले.

भाजपातीलच एका मोठ्या नेत्याच्या माध्यमातून 'बी टीम' तयार करून सर्व प्रभागांत उमेदवार उभे करण्यात आल्याचा आरोप होत आहे. मात्र या पॅनलचे आजवरचे कार्य आणि भूमिका धर्माबादच्या जनतेला चांगलीच माहिती आहे. त्यामुळे शहराची संस्कृती, सामाजिक सलोखा आणि विकास अबाधित ठेवण्यासाठी आमदार दांपत्याने जनतेला सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.आमदार दांपत्याच्या या वास्तववादी आणि भावनिक सादेमुळे काही प्रमाणात भरकटलेला मतदार पुन्हा भाजपाकडे वळल्याचे दिसून येत असून, निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात धर्माबादचे राजकीय चित्र पूर्णपणे बदलून भाजपमय झाले असल्याचे वातावरण आहे.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ फेब्रुवारी २६ च्या प्रथम आठवड्यात




**आत्ताच एक्सप्रेस**
**नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षांत समारंभ येत्या फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यात आयोजित करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी येत्या २८ डिसेंबर २०२५ पर्यंत विद्यापीठाकडे नोंदवलेल्या आपल्या मराठी नावाची पडताळणी करण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

डिसेंबर २०२४. फेब्रुवारी / मार्च २०२५ आणि मे / जून २०२५ या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर मराठी भाषेतील (देवनागरी लिपी) त्यांचे नाव अचूक यावे याकरीता नावाची पडताळणी व दुरुस्तीकरीता विशेष सुविधा विद्यापीठामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. प्रवेश अर्ज भरतेवेळी काही विद्यार्थी आपल्या नावाची मराठीतील नोंद अचूक करीत नाहीत, असे विद्यापीठाच्या निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार संबंधित विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर त्यांच्या मराठीतील नावातील संभाव्य चुका टाळण्यासाठी नाव पडताळणी व दुरुस्तीचे अभियान विद्यापीठामार्फत राबविण्यात येत आहे. उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांना दीक्षांत सोहळ्यात देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रासाठी आपले मराठी नाव पडताळणी आणि दुरुस्तीची सुविधा विद्यापीठाच्या https://31convocation.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी या संकेतस्थळास भेट देवून आपले मराठी नाव तपासून त्यात काही दुरुस्ती असल्यास ती येत्या दिनांक २८ डिसेंबर २०२५ पर्यंत करावी. तसेच विद्यार्थ्यांनी आपले मराठी नाव दुरुस्ती न केल्यास भविष्यात त्यांच्या प्रमाणपत्रावरील मराठीतील नाव दुरुस्तीसाठी विद्यापीठामार्फत शुल्क आकारण्यात येईल. त्यामुळे संबंधित सर्व विद्यार्थांनी दिलेल्या मुदतीत विद्यापीठ संकेतस्थळास भेट देऊन आपल्या पदवी प्रमाणपत्रावरील मराठी नावाचा तपशील अचूक असल्याची खात्री करावी व आवश्यक असल्यास त्यात योग्य ती दुरुस्ती करावी. या संदर्भात काही अडचण असल्यास या दूरध्वनी क्रमांकावर व sf-cycmou.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे आणि परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील यांनी केले आहे.

# कर्मयोगी संत गाडगे महाराज

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज पुण्यतिथी. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडाधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी, परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत.

देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते.

अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची ६९ वि पुण्यतिथी, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# आदिवासी व अती दुर्गम भागातील बालमृत्यूचे वाढते प्रमाण धक्कादायक!

एकीकडे सरकार सांगते की महाराष्ट्राचा विकास मोठ्या झपाट्याने होत आहे.तर दुसरीकडे आदिवासी व अती दुर्गम भागातील रहिवाशांची हालत अत्यंत खस्ता असल्याचे बालमृत्यूच्या वाढत्या प्रमाणावरून लक्षात येते.राज्यातील महत्वपूर्ण सात जिल्ह्यांमध्ये गेल्या तीन वर्षांत तब्बल १४५२६ बालमृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यान १२ डिसेंबरला विधानसभेत लेखी उत्तरात दिली. २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, अकोला व यवतमाळ अशा नामांकित जिल्ह्यांमध्ये वाढते बालमृत्यूचे प्रमाण अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे.बालमृत्यूचे अनेक कारणे असू शकतात परंतु या संपूर्ण कारणांकडे सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे बालमृत्यू वाढल्याचे दिसून येते.बालमृत्यूच्या वाढत्या प्रमाणावरून लक्षात येते की सरकारच्या निष्काळजीपणामुळे या सातही जिल्ह्यामध्ये आरोग्य सुविधा संपुर्णपणे ढासळलेली असुन अस्तव्यस्त अवस्थेत असल्याचे स्पष्ट दिसून येते.यावरून स्पष्ट होते की या सात जिल्ह्यांमध्ये ३ वर्षांच्या काळात १४५२६ बालमृत्यू झालेत,तर या अगोदर कितीतरी बालमृत्यू झाले असावे याची गणना आणखी धक्कादायक असु शकते.त्यामुळे बालमृत्यूचे वाढते प्रमाण हा अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय आहे.आपण जेव्हा राज्याच्या विकासाची भाषा बोलतो आणि करतो तेव्हा सर्वच स्तरातून विकास होणे आवश्यक असते परंतु तसे झालेच नाही त्यामुळे या सात जिल्ह्यांमध्ये आरोग्याच्या दृष्टीने सरकारचे लक्ष आतापर्यंत का गेले नाही? राज्यात मोठमोठ्या आरोग्य सुविधांची घोषणा केली जाते त्या या ठिकाणी का करण्यात आल्या नाहीत? ज्या आदिवासी भागात किंवा अती दुर्गम भागात आरोग्य योजनेची आवश्यकता आहे त्या का पोहचल्या नाही? आणि सरकारने आतापर्यंत या बाबतची कठोर चौकशी का केली नाही?असे अनेक प्रश्न वाढत्या बालमृत्यूच्या प्रमाणावरून उपस्थित होतात.राज्याचा विकास झालाच पाहिजे यात दुमत नाही आणि होत आहे परंतु विकासासोबतच आरोग्य सुविधा सुदृढ व्हायलाच हवी. अती दुर्गम भागातील व आदिवासी भागातील अशी गंभीर परिस्थिती पहाता अंगावर शहारे येतात.यावरून स्पष्ट होते की, सरकार व त्या जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी तेथील रहिवाशांवर पुर्णपणे दुर्लक्ष करीत असावेत.त्यामुळेच ही गंभीर परिस्थिती उध्दभवत असावी असे मला वाटते.

**-लेखक ,रमेश कृष्णराव लांजेवार ( स्वतंत्र पत्रकार )**

# संक्षिप्त

## समाजवादी पक्षाची स्वबळाची तयारी इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधण्याचे पक्षाचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/**जालना शहर महानगरपालिका निवडणूक २०२५ साठी समाजवादी पक्षाने स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केली असून, महानगरपालिकेतील सर्व प्रभागांमधील इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा, असे आवाहन पक्षाच्यावतीने करण्यात आले आहे.समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्र अध्यक्ष व मराठवाडा अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्हाध्यक्ष शेख नबी सिपोराकर व जालना महानगर अध्यक्ष दीपक शेळके यांनी शुक्रवार (दि. १९) रोजी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेतली. या बैठकीत महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेण्यात आला.यावेळी जिल्हाध्यक्ष शेख नबी सिपोराकर यांनी सांगितले की, लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये समाजवादी पक्ष महाविकास आघाडीचा घटक पक्ष होता. मात्र, महानगरपालिका निवडणुका जाहीर होऊनही काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या घटक पक्षांतील जालना जिल्ह्यातील कोणत्याही नेत्यांनी समाजवादी पक्षाशी संपर्क साधलेला नाही.लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या वेळी समाजवादी पक्षाची मदत घेतली जाते; मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत हे पक्ष स्वबळाची भूमिका घेतात. त्यामुळे समाजवादी पक्षही जालना महानगरपालिकेत स्वबळावर निवडणूक लढवणार आहे.वेळ कमी असला तरी जास्तीत जास्त प्रभागांमध्ये समाजवादी पक्षाचे उमेदवार उभे करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे नगरसेवक पदासाठी इच्छुक उमेदवारांनी रेल्वे स्टेशन-नूतनवसाहत रोडवरील डॉ. चाटे हॉस्पिटलजवळ असलेल्या कृष्णा प्लाझा येथील समाजवादी पक्षाच्या कार्यालयात सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत, दि. २२ डिसेंबरपर्यंत इच्छुक अर्ज सादर करावेत.इच्छुक उमेदवारी शुल्क सर्वसाधारण प्रवर्गासाठी २००० रुपये असून, ओबीसी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिला उमेदवारांसाठी १००० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. अर्ज सादर करताना मतदार ओळखपत्र, आधार कार्ड व पासपोर्ट साइज फोटो सोबत आणणे आवश्यक आहे.या बैठकीस समाजवादी पक्षाचे जिल्हा व जालना महानगर कार्यकारिणीचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चिंतन अध्यात्माच्या नादाने विज्ञानाकडे पाठ फिरवलेला भारत

अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी शहर मध्ये प्रसिद्ध साई बाबा मंदिर आहे.लाखों भक्तांच्या दुख मुक्तीसाठी ते प्रसिद्ध आहे. श्रद्धा सबुरी आणि भक्ति समोर सर्व आधुनिक तंत्रज्ञान स्पेशल फेल आहे. त्या ठिकाणी भक्त दरवर्षी पायी पदयात्रा काढतात. आणि सर्व संकटवर मात करतात.अशा ऐतीहासिक मंदिराच्या मुख्य द्वाराजवळ २२ ऑक्टोबर २०२५ ला साई सिल्क बिग बाज़ार मध्ये रात्री भीषण आग लागली.आग कशी लागली हा बिनडोक लोकांचा प्रश्न आहे.आग येवढी भयंकर होती कि आजूबाजू चे काही दुकाने त्या आगीच्या लपेट मध्ये आले आणि लाखोंचे नुकसान झाले.मानव निर्मित अग्निशामक दलाने ती विजवली असे नास्तिक लोकांकडून सांगितले जाते.आधुनिक तंत्रज्ञान फेल का गेले असे लोक म्हणजे भक्त विचारू शकत नाही कारण हा श्रद्धा सबुरी आणि भक्तिचा अध्यात्माचा मार्ग आहे त्यावर अविश्वास दाखवून प्रश्न विचारण्याचा अधिकार माणसांना नाही. असो..

गेल्या दीड हजार वर्षांत भौतिकशास्त्र,रसायनशास्त्र,जीवशास्त्र,वैद्यकशास्त्र अशा विविध क्षेत्रांत क्रांतिकारी शोध लागले. त्या शोधांवर आधारित तंत्रज्ञान विकसित झाले आणि जग अधिक सुविधापूर्ण, सुरक्षित व वैज्ञानिक झाले.पण या जागतिक शोधयात्रेत भारतीय नाव मात्र क्वचितच दिसते.तरीही आपण हे सर्व आमच्या त्रिकालज्ञ ऋषींनी वेदांत सांगितले, पाश्चात्त्यांनी ते चोरले असा आत्मवंचित दावा करतो, आणि त्यावर टाळ्या देखील वाजवतो. हीच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय शोकांतिका आहे. इ.स. ५०० नंतर भारतीय समाजाने ऐहिक जीवनाकडे पाठ फिरवली. हे जग मिथ्या, खरे ते परलोकात हा समज कथा,कीर्तन,पुराणनिरूपणांतून खोलवर रुजला. विज्ञानाची पायाभूत बीजे असलेले प्रश्न विचारणे,निरीक्षणे करणे,कुतूहल बाळगणे, ही सर्व प्रक्रिया खुंटली.इहलोक नको,परलोक हवा या प्रवृत्तीने भारतीय बुद्धिमत्ता धर्मकथांच्या भोवऱ्यात अडकून पडली.पाऊस का पडतो ?, ऋतू का बदलतात?, चंद्र खाली का पडत नाही ?,पाणी उताराकडे का वाहते ? असे मूलभूत प्रश्न बहुसंख्यांना कधी पडलेच नाहीत. जेव्हा गार्गीसारख्यांना पडले, तेव्हा उत्तर परमात्मा तसे करतो हे दिले गेले, आणि कुतूहल संपले.विचार थांबला की शोध जन्माला येत नाही. हेच भारतात घडले. न्यूटन जर आपल्या प्रश्नांसाठी धर्मगुरूकडे गेला असता,तर त्याच्याही माथी ईश्वराची करणी असेच उत्तर आले असते.मग गुरुत्वाकर्षणाचा नियम जन्मलाच नसता.पण न्यूटनने श्रद्धेपेक्षा संशय निवडला आणि जग बदलले.आपण मात्र गार्गीसारखे उत्तर ऐकून शांत झालो.भारत अध्यात्माऐवजी भौतिक संशोधनाकडे वळला असते, तर भारताच्या तांत्रिक प्रवासाची दिशा किती वेगळी असती याची कल्पना सुद्धा चकित करणारी आहे. पण या प्रज्ञावंतांची क्षमता मोक्ष,ब्रह्मसाक्षात्कार,अद्वैत आणि अदृश्य शक्तींच्या शोधात खर्च झाली.पांडवकाळात दळणासाठी जी जात्यासारखी साधने होती,तीच साधने पेशवाईत होती. शतकानुशतके सुधारणा नाही.वैज्ञानिक विचार नसेल तर साधने,तंत्रज्ञान, उत्पादनक्षमता काहीच बदलत नाही.परिणामी देश मागेच राहतो. संत,कवी,पुराणे,व्रत-महात्म्ये,अभंगहजारो ग्रंथ लिहिले गेले.पण या धार्मिक साहित्याच्या उदंड पिकातून एकाही शोधाचा जन्म झाला नाही. विज्ञानमूलक विचार दाबला गेला, अध्यात्माला खोटा वैज्ञानिक मुखवटा लावला गेला आणि भारताची प्रगती अडखळली.भारत विज्ञानात मागे पडण्याचे मुख्य कारण म्हणजे अध्यात्म,मोक्षप्राप्ती आणि जन्म-मरणाच्या काल्पनिक फेर्यांतून सुटका करण्याच्या वेडाने समाजाला पकडून ठेवणे.आजही अनेक जण विज्ञान मिथ्या,अध्यात्म सत्य असे मानतात आणि म्हणूनच विज्ञान आपल्यापासून दूर पळते. भारताला पुढे न्यायचे असेल,तर परलोकाच्या ध्यासातून बाहेर येऊन इहलोकातील प्रश्नांची उत्तरे विज्ञानात शोधावी लागतील. कुतूहल पुन्हा प्रज्वलित करावे लागेल.संशय, प्रयोग आणि निरीक्षण यांची संस्कृती रुजवावी लागेल.मानवाच्या जीवनातील दु:ख २००/३०० किलोमीटर पायी पदयात्रेने मिटत असतील,तर मंदिरासमोर दुकानाला लागलेली आग विझविण्यास मानवाला का यावे लागले. हा प्रश्न विना चपल पायी पदयात्रा काढणाऱ्या आणि हातात स्मार्ट मोबाइल असणाऱ्या तरुणांना का पडत नाही?. हा लेख लिहण्या मागील उदेश कोणाच्या धार्मिक भावना दुखवण्यासाठी नाही तर चिंतन अध्यात्माच्या नादाने विज्ञानाकडे पाठ फिरवलेला भारतातील तरुणांना अज्ञान आणि विज्ञान ही सत्य दाखवून देण्याचा प्रयत्न आहे.काही संपादकांना या लेखातील वस्तुस्थिती मान्य नसेल कारण त्यांच्यात त्यांचे भावनिक,सामाजिक,आर्थिक हितसंबंध त्यात गुंतलेले असतील तर त्यांनी लेख प्रसिद्ध केला नाही तरी हरकत नाही. **-सागर रामभाऊ तायडे,भांडूप,मुंबई**

# एन.डी. स्टुडिओला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल

**सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांचे प्रतिपादन**

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** कलेच्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या एका मराठी माणसाने उभे केलेले साम्राज्य म्हणजे एन.डी. स्टुडिओ. नितीन देसाई यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासनाने पुढाकार घेत एन.डी. स्टुडिओच्या जतन व संवर्धनाची जबाबदारी नम्रपणे स्वीकारली असून, या स्टुडिओला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाअंतर्गत एन.डी. आर्ट वर्ल्ड लिमिटेड येथे शुक्रवारी पत्रकार व टूर ऑपरेटर्ससाठी आयोजित भेटीप्रसंगी झालेल्या छोटेखानी सांस्कृतिक कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक तथा एन.डी.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल जोगळेकर, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा वित्त अधिकारी चित्रलेखा खातू-रावराणे, उपअभियंता (स्थापत्य) विजय बापट, प्रशासकीय अधिकारी सचिन निबाळकर आणि श्रीकांत देसाई उपस्थित होते.

याप्रसंगी २५ ते ३१ डिसेंबर रोजी एन.डी. स्टुडिओ येथे होणाऱ्या कार्निव्हलच्या पोस्टरचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.स्वाती म्हसे पाटील म्हणाल्या, नितीन देसाई हे आधुनिक विश्वकर्मा होते. त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील. एन.डी. स्टुडिओचे संचालन आता गोरेगाव चित्रनगरीच्या माध्यमातून केले जात असून, स्टुडिओसाठी स्वतंत्र संकेतस्थळ व बुकिंग ॲप सुरू करण्यात आले आहे. आगामी काळात विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.प्रास्ताविकात मीनल जोगळेकर यांनी सांगितले की, भव्यता म्हणजे काय, हे नितीन देसाई या मराठी माणसाने दाखवून दिले. त्यांचे शासनाशी ऋणानुबंध होते, असे सांगत त्यांनी नितीन देसाई यांच्या आठवणींना उजाळा दिला.



**भव्य एन.डी. कार्निव्हलचे आयोजन**

दिनांक : २५ ते ३१ डिसेंबर २०२५

वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ५

स्थळ : एन.डी. स्टुडिओ, कर्जत

या कार्निव्हलमध्ये खेळ, मनोरंजन तसेच सेलिब्रिटींसोबत गप्पांचा कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येणार आहे.तिकीट दर :सर्व वयोगटांसाठी (५ वर्षांवरील) - १४९९ (जेवण व नाश्त्यासह) एकाच वेळी २५ किंवा अधिक तिकिटांचे बुकिंग केल्यास - १३९९ प्रति तिकीट तिकीट बुकिंग ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही पद्धतीने उपलब्ध असून,www.ndart-world.com या संकेतस्थळावर ऑनलाईन तिकीट मिळणार आहेत.

**कलाकारांची विशेष उपस्थिती**

२५ डिसेंबर । दु. ४ ते ६ - कविता लाड

२६ डिसेंबर । दु. ४ ते ६ - सुव्रत जोशी, सखी गोखले

२७ डिसेंबर । दु. ४ ते ६ - अदिती सारंगधर

२८ डिसेंबर । दु. १२ ते २ - विराजस कुलकर्णी, उर्मिला कोठारे, विक्रम गायकवाड

२९ डिसेंबर । दु. ४ ते ६ - आनंद इंगळे

३० डिसेंबर । दु. ४ ते ६ - डॉ. गिरीश ओक

३१ डिसेंबर । दु. ४ ते ६ - संजय मोने

# बोधेगावच्या सरपंचांची हकालपट्टी निधी अपहारप्रकरणी विभागीय आयुक्तांचा निर्णय

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री / प्रतिनिधी/** फुलंब्री तालुक्यातील बोधेगाव (खुर्द) ग्रामपंचायतीतील विकासकामांत आर्थिक अनियमितता व निधीचा तात्पुरता अपहार केल्याप्रकरणी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी कडक कारवाई केली आहे. या प्रकरणात सरपंच भानुदास तायडे यांना सरपंच पदावरून अपात्र घोषित करण्यात आले आहे.

बोधेगाव येथील रहिवासी राजू मोटे यांनी या संदर्भात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या चौकशीत गंभीर बाबी समोर आल्या.१५ व्या वित्त आयोगांतर्गत मंजूर ड्रेनेज लाईनच्या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले. सदर कामास २७ एप्रिल २०२३ रोजी तांत्रिक मान्यता मिळाली असताना, त्याआधीच सुमारे २ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला होता. प्रत्यक्ष काम मात्र जून २०२३ मध्ये करण्यात आले. त्यामुळे हा निधीचा तात्पुरता अपहार असल्याचे स्पष्ट झाले.




> उशिरा का होईना, पण या प्रकरणात न्याय मिळाला आहे,
> **- राजू मोटे, तक्रारदार**

विभागीय आयुक्तांनी चौकशीअंती अपहार झालेली रक्कम व्याजासह वसूल करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच सरपंच भानुदास तायडे यांना दोषी ठरवत पदावरून अपात्र घोषित करण्यात आले आहे.

दरम्यान, या निर्णयाविरोधात न्यायालयात दाद मागणार असल्याचे सरपंच भानुदास तायडे यांनी सांगितले आहे.

शासनाच्या नियमांनुसार या निकालाविरोधात न्यायालयात न्याय मागणार आहे,

**- भानुदास तायडे, सरपंच, बोधेगाव (खुर्द)**

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सामाजिक कार्यकर्ते आण्णाभाऊ सोनवणे (खामगाव) यांनी प्रशासनाच्या विलंबाबाबत नाराजी व्यक्त केली.

तिसरे अपत्य, गायरान जमिनीवरील अतिक्रमण आणि शासकीय कामातील आर्थिक घोटाळे याबाबत तक्रारी होऊनही निकाल अनेकदा पाच वर्षांचा कार्यकाळ संपल्यानंतर लागतो. त्यामुळे नागरिक तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. अशा प्रकरणांचा निकाल सहा महिने ते वर्षभरात लागणे अपेक्षित आहे,

**- आण्णाभाऊ सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते**

# आज मतदान केंद्रांची यादी जाहीर होणार

**निवडणूक तयारीला वेग**

**क्षेत्रीय अधिकारी व विविध पथकांची नियुक्ती**

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमाची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने केली असून, त्यानुसार आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. आयोगाच्या कार्यक्रमानुसार २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान केंद्रांची यादी प्रसिद्ध केली जाणार असून, त्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने आवश्यक तयारी सुरू केली आहे, अशी माहिती निवडणूक विभागाने दिली.

आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी तसेच निवडणूक प्रक्रिया सुसूत्र, पारदर्शक आणि शांततेत पार पडावी यासाठी महानगरपालिका प्रशासनाने प्रत्येकी निवडणूक निर्णय अधिकारीनिहाय एकूण ९ भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच १५ स्थिर सर्वेक्षण पथके, २८ व्हिडिओ सर्वेक्षण पथके आणि ९ व्हिडिओ चित्रीकरण तपासणी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे.

याशिवाय प्रत्येकी निवडणूक निर्णय अधिकारीनिहाय एकूण १७ क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, याबाबतचे अधिकृत आदेश पुढील दोन दिवसांत निर्गमित केले जाणार आहेत, असे निवडणूक विभागाने स्पष्ट केले.महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निर्भीड, पारदर्शक आणि नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असून, सर्व संबंधित यंत्रणा समन्वयाने काम करत असल्याचेही निवडणूक विभागातर्फे सांगण्यात आले आहे.

# माजी सैनिकांसाठी लिपिक-टंकलेखक साठी पदभरती

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक-टंकलेखक (गट-क) या पदांच्या भरतीसाठी एकूण ७२ पदांसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेल्या माजी सैनिकांसह, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार युद्धकाळात किंवा युद्ध नसताना सैनिकी सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येऊन सेवेस अयोग्य ठरलेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एक पात्र व्यक्तीस, पसंतीक्रमानुसार निवड करण्यात येणार आहे.

७२ पदांपैकी ३ पदे किमान ४० टक्के अपंगत्व असलेल्या दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव असून, दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचा विचार करून गुणवत्ता व उपलब्धतेनुसार भरती करण्यात येणार आहे.

भरती प्रक्रिया टीसीएस-आयओएन (TCS-ION) यांच्या मार्फत राबविण्यात येणार असून, परीक्षेसाठी अर्ज केवळ ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.पात्र उमेदवारांनी वेब-आधारित ऑनलाईन अर्ज www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री २३.५९ वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे, असे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

**जिल्हा प्रशासनाचा अभिनव उपक्रम**

# पारदर्शक प्रशासनासाठी दस्तऐवजावर क्यू आर कोड आणि युनिक आयडी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्हा प्रशासनाने सुशासन सप्ताह अभियानांतर्गत विकसित केलेली दस्तऐवज पडताळणी (Document Verification) सुविधा ही एक सुरक्षित व तंत्रज्ञानाधारित प्रणाली आहे. हा उपक्रम जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर दिलीप स्वामी यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला आहे.

या प्रणालीमध्ये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी णीशी ID व Password आधारित सुरक्षित लॉगिनची सुविधा उपलब्ध आहे. संबंधित शासकीय अधिकारी लॉगिन करून निर्गमित होणाऱ्या दस्तऐवजांना युनिक आयडी (Unique ID) व QR कोड मॅप करतात. हा युनिक आयडी व ठथ कोड त्या दस्तऐवजाची ओळख व सत्यता सुनिश्चित करतो.

नागरिक तसेच इतर शासकीय कार्यालये https://verify.dmcsn.com/ या पोर्टलवर दस्तऐवजावरील QR कोड स्कॅन करून किंवा युनिक आयडी प्रविष्ट करून संबंधित दस्तऐवजाची त्वरित पडताळणी करू शकतात. यामुळे तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयातून निर्गमित होणाऱ्या विविध आदेश, प्रमाणपत्रे व इतर शासकीय दस्तऐवजांची खात्रीशीर तपासणी सुलभ होते.

ही सुविधा नागरिक व शासकीय कार्यालयांना वेळेत व अचूक दस्तऐवज पडताळणी करण्यास मदत करते. बनावट, फेरफार केलेले किंवा संपादित (Editable) दस्तऐवज ओळखून त्यापासून होणारे गैरप्रकार, फसवणूक व पुढील कायदेशीर अडचणी टाळण्यासाठी ही प्रणाली प्रभावी ठरत असून, प्रशासनातील पारदर्शकता, विश्वासार्हता आणि कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होत आहे. जिल्हा प्रशासन अंतर्गत होणाऱ्या महसूल आणि इतर विभागाअंतर्गत होणारा पत्रव्यवहार तसेच यातून विविध कागदपत्रे प्रमाणपत्रे नागरिकांना वितरित केले जातात हे वितरित करत असताना त्याचे प्रमाणिकीकरण ओळखण्यासाठी क्यू आर कोड द्वारे वेगळी ओळख कायमस्वरूपी देण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना हे कागदपत्र कोठेही आणि कधीही संबंधित कागदपत्राचा क्यू आर कोड स्कॅन करून पाहता येणार आहे.ही सुविधा निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करण्यात आली असून, याचे डिझाइन व विकास प्रकल्प व्यवस्थापक, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी केले आहे.

# महानगरपालिकेच्या रुग्णालयात मोफत लॅप्रोस्कोपिक कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया शिबिर

**सुरक्षित व परिणामकारक सुविधांचा लाभ; ११ महिलांवर यशस्वी शस्त्रक्रिया**

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाच्या वतीने गुरुवार, दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी सिल्कमिल कॉलनी येथील महानगरपालिका रुग्णालयात मोफत लॅप्रोस्कोपिक स्त्री कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात ११ महिलांवर दुर्बिणीद्वारे कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आल्या. सर्व शस्त्रक्रिया सुरक्षितपणे व कोणत्याही अडथळ्याविना पार पडल्या. महानगरपालिकेच्या लॅप्रोस्कोपी शिबिरांमधून आतापर्यंत एकूण ९० महिलांवर मोफत स्त्री कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

महानगरपालिकेच्या पाच रुग्णालयांमध्ये - सिडको एन-८, सिल्कमिल कॉलनी, कैसर कॉलनी, नेहरूनगर व सिडको एन-११ - येथे पुढील काळातही नियमितपणे लॅप्रोस्कोपिक स्त्री कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित करण्यात येणार असून, जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.हे शिबिर यशस्वी होण्यासाठी सिल्कमिल कॉलनी रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. यामध्ये डॉ. गोविंद नरवणे, डॉ. पंडित शिरसाट, डॉ. विजय दवंडे, डॉ. डिंपल परदेशी, डॉ. कल्पना राठोड, डॉ. सूर्यकुमार ठाकूर, डॉ. सौरभ सरनाईक तसेच परिचारिका व कर्मचारी बेबीनंदा झांबरे, ज्योती अमोलिक, आनंद बेंद्रे, अंकिता सदाशिवे, वर्षा सोनवणे, सारिका कुलकर्णी, सविता दिवेवर, ज्योती जगदाळे, अर्चना डुकरे, विजयमाला करडकर, आसमा शेख, प्राजक्ता लांजेवार, ज्योती पवार, वंदना वडाळे, आनंद कांबळे आदींच्या उत्तम समन्वयामुळे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

# राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त अंबड येथे जनजागृती अभियान

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड (प्रतिनिधी)** राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त अखिल भारतीय ग्राहक पंचायत जालना व पवन करिअर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने अंबड येथे ग्राहक जनजागृती अभियान राबविण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून किरणकुमार खाडेंभराट (तालुका पुरवठा अधिकारी) उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रमेश तारगे (अध्यक्ष, ग्राहक पंचायत जालना तसेच अशासकीय सदस्य, ग्राहक संरक्षण परिषद जालना) होते.प्रमुख पाहुणे म्हणून संतोष जिगे (अध्यक्ष, तालुका पत्रकार संघ अंबड), देवानंद चित्राल (जिल्हा पर्यावरण प्रमुख), दिनकर वाघ (संपादक, आधार न्यूज) तसेच प्रा. शिकारे (प्रमुख, पवन करिअर अकॅडमी) यांची उपस्थिती लाभली.यावेळी मार्गदर्शन करताना तालुका पुरवठा अधिकारी किरणकुमार खाडेंभराट म्हणाले की, राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यामागील मुख्य उद्देश ग्राहकांनी जागरूक राहणे हा आहे.

**अखिल भारतीय ग्राहक पंचायत जालना व पवन करिअर अकॅडमीचा संयुक्त उपक्रम**

खरेदी करताना नेहमी रितसर पावती घ्यावी. विशेषतः अंबड तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानांतून पावती घेऊनच माल खरेदी करावा. कोणतीही तक्रार असल्यास तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधावा, असे त्यांनी सांगितले.

प्रस्ताविकात डॉ. रमेश तारगे यांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायतची भूमिका स्पष्ट करत सांगितले की, ग्राहक दिन दरवर्षी साजरा केला जातो; मात्र यंदा ग्राहक पंचायतच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण होऊन ५१व्या वर्षात पदार्पण होत आहे. जिल्हाभरातील महाविद्यालयांत जनजागृती उपक्रम राबवून ग्राहक कायद्याची माहिती माहितीपत्रकांद्वारे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत प्रत्येकजण ग्राहक असतो.

त्यामुळे फसवणूक टाळण्यासाठी तरुणांनी ग्राहक कायद्याची माहिती ठेवणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.तसेच शासनस्तरावर जनजागृतीसाठी आर्थिक तरतुदी उपलब्ध असून जिल्हा व तालुका प्रशासनाने अधिकाधिक जनजागृती कार्यक्रम राबवावेत, असे आवाहन त्यांनी केले.देवानंद चित्राल यांनी आपल्या रोखठोक शैलीत विद्यार्थ्यांना



मार्गदर्शन केले.

प्रा. शिकारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्हा स्त्री रुग्णालयात बिनटाका शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना शहरातील गांधीचमन येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत बिनटाका लॅप्रोस्कोपिक) शस्त्रक्रिया शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

या शिबिरात एकूण १४ लाभार्थी महिलांवर दुर्बिणीद्वारे सुरक्षित शस्त्रक्रिया करण्यात आल्या.हे शिबिर जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. एस. झेड. गवारे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. शस्त्रक्रियांसाठी स्त्रीरोग तज्ज्ञ वर्ग-१ डॉ. प्राची तारसेट्टीवार, विभागप्रमुख डॉ. वर्षा देशमुख तसेच सहकार्य करणारे स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. लोंढे, डॉ. मिसाळ, डॉ. भगत, डॉ. प्रविण, डॉ. प्राची सराफ यांनी सहभाग घेतला. मेट्रन खलंग्रीकर, उषा बारगळ, घोरपडे आदींनी शिबिरासाठी विशेष परिश्रम घेतले.

शिबिरासाठी लाभार्थी महिलांना प्रवृत्त करणे तसेच शिबिर यशस्वी करण्यासाठी जालना महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. अतुल राजे, महिला डॉक्टर, आलेक ब्रदर्स, आरोग्य सेवक भूमरे यांच्यासह सर्व वैद्यकीय अधिकारी व नर्सिंग पथकाने महिलांची विशेष काळजी घेतली.

या शिबिरातील सर्व बिनटाका शस्त्रक्रिया सर्जन डॉ. मसुरे यांनी यशस्वीरीत्या पार पाडल्या.



त्यांना सुनिता घोरपडे, राहुल हनवते, आरोग्य सहायक सोनार यांनी सहकार्य केले. लाभार्थ्यांची तपासणी डॉ. तौर यांनी केली, तर आरोग्य विभागातील आठवले व कुलकर्णी यांनी सहकार्य केले. शिबिराचे नियोजन डॉ. संतोष राऊत यांनी केले.यापुढेही दरमहा जिल्हा स्त्री रुग्णालयात बिनटाका शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात येणार असून, इच्छुक महिलांनी रुग्णालयातील आठवले सिस्टर यांच्याकडे नोंदणी करावी, असे आवाहन अधीक्षक डॉ. एस. झेड. गवारे यांनी केले आहे.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** ख्रिसमस (२५ डिसेंबर), वर्षाचा शेवटचा दिवस (३१ डिसेंबर), नुतन वर्ष स्वागत (१ जानेवारी) तसेच भिमा कोरेगाव शौर्य दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी जालना जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे.मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये अपर जिल्हादंडाधिकारी श्री. शशिकांत हदगल यांनी हे आदेश जारी केले असून, दि. १८ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. १ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत हे आदेश लागू राहतील.या कालावधीत शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच व्यक्तींचे प्रेते, आकृत्या अथवा प्रतिमांचे प्रदर्शन करण्यास बंदी राहील. जाहीर घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे यावरही निर्बंध असतील.कोणत्याही रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींनी एकत्र जमणे अथवा मिरवणूक काढणे प्रतिबंधित राहणार आहे. मात्र, अधिकारी-कर्मचारी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी विशेष परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा किंवा मोर्चांना हा आदेश लागू राहणार नाही, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## रावसाहेब पाटील दानवे यांचे नवनियुक्त भाजप राष्ट्रीय कार्याध्यक्ष नितीनजी नबीन यांना अभिनंदन



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** भारतीय जनता पक्षाचे नवनियुक्त राष्ट्रीय कार्याध्यक्ष नितीनजी नबीन यांची माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कार्यालयात सदिच्छा भेट देऊन मनःपूर्वक अभिनंदन केले आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. दानवे यांनी म्हटले की, माननीय नितीनजी यांचा पक्षकार्याचा दांडगा अनुभव, संघटनकौशल्य आणि सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची कार्यपद्धती लक्षात घेतल्यास, त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष आगामी काळात यशाची नवी शिखरे गाठेल, असा त्यांना दृढ विश्वास आहे. भाजपचा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असताना पासून नितीनजी यांशी त्यांची जुनी ओळख असून, सामान्य कार्यकर्त्यापासून संघटनेत काम करत त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली आहे, असेही त्यांनी सांगितले.

# भेंडाळा तांडा (शिवार) येथील अतिवृष्टी अनुदान रखडले; शेतकरी वंचित

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड /प्रतिनिधी/** घनसावंगी तालुक्यातील मौजे भेंडाळा तांडा (शिवार) येथील शेतकऱ्यांना सन २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान सहन करावे लागले. या अतिवृष्टीमुळे मुख्यत्वे गहू, सोयाबीन, ज्वारी, भाजीपाला आणि इतर कृषी पिकांचे उत्पादन संपूर्ण किंवा अर्धवट नष्ट झाले असून, शेतकऱ्यांना आर्थिक संकट निर्माण झाले आहे.शासनाच्या नियमानुसार, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले शेतकरी अनुदान मिळवण्यास पात्र असतात. तथापि, भेंडाळा तांडा येथील शेतकऱ्यांसाठी २०२५ च्या अतिवृष्टी अनुदान यादी अद्याप ऑनलाइन पोर्टलवर अपलोड केलेली नाही. परिणामी, शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले आहेत आणि त्यांच्या पुढील हंगामासाठी लागणारे बियाणे, खत, पिकसुरक्षित उपाययोजना आणि इतर आवश्यक शेती साहित्य खरेदी करणे कठीण झाले आहे.

याबाबत भेंडाळा तांडा येथील सर्व शेतकरी बाधितांकडून घनसावंगी तहसीलदार यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ग्राम महसूल अधिकारी यांनी सुमारे दीड महिन्यांपूर्वी अतिवृष्टी अनुदान २०२५ ची यादी तहसील कार्यालयात सादर केली होती. सदर यादीवर संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची स्वाक्षरीही झाल्याचे ग्रामपंचायत कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. यानंतरही, आवश्यक




सर्व प्रक्रिया पूर्ण होऊनही ही यादी पोर्टलवर अपलोड करण्यात आलेली नाही, ज्यामुळे शेतकऱ्यांना अनुदान मिळवण्यात अडथळा निर्माण झाला आहे.

शेतकऱ्यांनी त्यांच्या निवेदनात तातडीने हे प्रकरण लक्षात घेण्याची आणि शासन नियमांनुसार भेंडाळा तांडा (शिवार) येथील अतिवृष्टी अनुदान २०२५ ची यादी त्वरित ऑनलाइन पोर्टलवर अपलोड करून लवकरात लवकर अनुदान वितरित करण्याची मागणी केली आहे. त्यांनी असेही नमूद केले की, विलंबामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिक बिकट होऊ शकते, तसेच पुढील पिकांसाठी लागणारी तयारी बाधित होईल.शेतकरी बाधितांच्या या तक्रारीवर प्रशासनाच्या द्रुत प्रतिसादाची अपेक्षा असून, यादी त्वरित पोर्टलवर अपलोड होऊन अनुदान वितरण प्रक्रियेला गती मिळवून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे आवश्यक आहे. यामुळे केवळ शेतकऱ्यांचे आर्थिक संकट कमी होणार नाही तर त्यांच्या आत्मविश्वास आणि शेतीत गुंतवणुकीची तयारीही पुनर्संचित होईल.

# चंद्रसागर धर्मशाळेचे कार्य प्रशासनीय संजय पापडीवाल

**आत्ताच एक्सप्रेस**

**छ.संभाजीनगर/प्रतिनिधी/** चंद्रसागर धर्मशाळेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच १४/१२/२५ रोजी शहागंज येथे संपन्न झाली. सभेच्या अध्यक्ष स्थानी भारत वर्षीय तीर्थरक्षा कमिटीचे उपाध्यक्ष संजय पापडीवाल यांच्या अध्यक्षते खाली सभा संपन्न झाली.सर्वप्रथम सभेची सुरवात राजकुमार पांडे व यातीन ठोळे यांच्या मंगलाचरण ने करण्यात आली . ,राजकुमार पांडे ,अनिल ठोळे ,प्रसाद पाटनी ललित लोहाडे ,पारस अजमेरा ,आशिष कासलीवाल ,सुरेंद्र पाटणी यांच्या सह सभासदांची उपस्थिती होती .

यावेळी माघील प्रोसिडिंग चे वाचन ललित लोहाडे यांनी केले तर २०२४-२५ च्या अहवाल वाचन सेक्रेटरी श्रेणिक कासलीवाल यांनी केले.

यावेळी साधुसंत व संस्थापकीय सदस्य तसेच दिगवंत महानुभाव यांना श्रद्धांजली देण्यात आली. तसेच सभेचे अध्यक्ष यांनी सांगितले कि चंद्रसागर धर्मशाळेचे कार्य प्रशासनीय आहे येथे बाहेर गावाच्या यात्रेकरू साठी उच्च प्रतीचे रूम आहे ,तसेच या संस्थेत नेहमीच सामाजिक व जनकल्याण करी उपक्रम राबले जातात



यावेळी सभेचे प्रस्थाविक सेक्रेटरी श्रेणिक कासलीवाल यांनी केले ,तर सूत्र संचालन यतीन ठोळे यांनी केले.यावेळी भ.शांतीनाथ व आचार्य कल्प चंद्रसागर महाराज यांच्या फोटोस पुष्प अर्पण करण्यात आले .

तसेच सभेचे दीप प्रज्वलन करण्यात आले यावेळी सभेचे अध्यक्ष संजय पापडीवाल पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी , पंचायत सचिव प्रकाश अजमेरा ,संस्थेचे सेक्रेटरी श्रेणिक कासलीवाल

तसेच संस्थेचे सेक्रेटरी श्रेणिक कासलीवाल यांनी संस्थेत चालू असलेल्या विविध कार्याची माहिती दिली त्यात सांगितले कि येणाऱ्या यातेकरू करिता व समाज बांधवान करिता अत्याधुनिक भोजन शाळा निर्माण कार्य सुरु आहे व रूमचे नूतनी कारण होणार आहे या सर्व कार्याला सर्व सभासदांनी एक मुखाने मंजुरी आली.शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रसाद पाटणी यांनी केले सभा यशस्वी करनासाठी व्यवस्थापक प्रशांत लव्हाडे याचे सहकार्य मिळाला.

# टेंभुर्णी येथे भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन तब्बल दोन लाख रुपयांच्या बक्षिसांची लूट



**आत्ताच एक्सप्रेस**

**टेंभुर्णी (प्रतिनिधी)** जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी शहरात दत्तयात्रा तसेच संत चंदनबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त यंदाही भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मागील वर्षी मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे यंदा अधिक भव्य स्वरूपात ही स्पर्धा होत असून कुस्तीप्रेमी व नामवंत कुस्तीगीरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यात्रा समिती व आयोजकांकडून करण्यात आले आहे.

या कुस्ती स्पर्धेचा भव्य उद्घाटन सोहळा या भागाचे आमदार व पंचायत राज समिती (महाराष्ट्र) अध्यक्ष संतोष दानवे यांच्या हस्ते होणार आहे.

शनिवार, दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता उद्घाटन सोहळा संपन्न होणार असून त्यानंतर तात्काळ कुस्ती सामने सुरू होतील, अशी माहिती आयोजकांनी दिली.

या स्पर्धेमध्ये एकूण रुपये दोन लाखांपर्यंत बक्षिसांची लूट ठेवण्यात आली असून अंतिम विजेत्यास ११ हजार रुपये रोख बक्षीस देण्यात येणार आहे.

स्पर्धेचे प्रमुख नियम व अटी :स्पर्धेदरम्यान कुस्तीगीरास कोणतीही दुखापत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कुस्तीगीराची राहील.

पंचांचा निर्णय अंतिम राहील. पंचक्रोशीतील नागरिकांनी तसेच कुस्तीप्रेमींनी या भव्य कुस्ती स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीच्या संचालक मंडळाकडून करण्यात आले आहे.

# संक्षिप्त

**महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक-२०२५**

## महानगरपालिका क्षेत्रात शस्त्रास्त्रे बाळगण्यास बंदी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ती, दंडाधिकारी शक्ती प्रदान केलेले अधिकारी, पोलीस अधिकारी-कर्मचारी, बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेवरील अधिकारी-कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त मा. उच्च न्यायालयातील रिट पिटीशन ४१७१ व ४२४३/२०१४ च्या आदेशास अधीन राहुन जिल्ह्यातील महानगरपालिका कार्यक्षेत्रातील परवानाधारक व्यक्तींनी परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास बंदी घालण्यात आली आहे. असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक-२०२५कार्यक्रम घोषित करण्यात आला असुन महानगरपालिका कार्यक्षेत्रात आदर्श आचार संहिता दि. १५ डिसेंबर २०२५ पासुन लागु झाली आहे, सदर निवडणुका निर्भय आणि शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी जालना जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन निवडणुक घोषित झाल्यापासुन निवडणुक निकाल घोषित होईपर्यत, शस्त्र परवानाधारक यांना परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास निर्बंध लागू करणे आवश्यक आहे. जिल्हयातील शस्त्र परवानाधारकास नोटीस देवून त्यांचे म्हणणे ऐकुन घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढण्यात आले आहेत. संबंधित शस्त्र परवानाधारकांनी आपले शस्त्र नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये जमा करावेत. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर एक आठवड्याचे आत संबधितांचे शस्त्र परत करण्यात यावे. सदर आदेश जालना जिल्ह्यासाठी निर्गमित झाल्याच्या तारखेपासुन दि. १६ जानेवारी २०२६ पर्यंत अंमलात राहील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

## साखर शाळा सुरु करण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** घनसावंगी तालुक्यातील सागर कारखाना परिसरातील ऊसतोड मजूर कामगारांच्या छावणीमध्ये गुरुवार दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा माहिला व बालविकास अधिकारी आर. व्ही. कड यांच्या मार्गदर्शनानूसार कायदेविषयक माहिती, बालकांचे अधिकार, बाल विवाह, चाईल्ड हेल्पलाईन १०९८, महिला हेल्पलाईन आणि शाळा बाह्य विद्यार्थ्यांना साखर शाळा सुरु करण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला.

जिल्हा महिला व बालविकास विभाग जालना आणि शिक्षण विभाग घनसावंगी यांच्या संयुक्त पथकाने पालक, बालकांना मार्गदर्शन केले. महिला व बाल विकास विभाग जालना कार्यालयातील जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन इंगळे, संतोष दाभाडे, वनिता पिंपळे, घनसावंगीचे शाम गोरे, अंबडचे संरक्षण अधिकारी मीनाक्षी शिंदे, वाहन चालक सुमेध मुंढे, शिक्षण विभाग घनसावंगीचे देवा चित्राल, केंद्र प्रमुख प्रकाश खराबे यांनी यांनी यावेळी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी अंगणवाडी कार्यकर्ती श्रीमती काळे यांनी कारखाना पर्यवेक्षक सुरेश कुडेकर यांच्यासह ऊसतोड मजूरांच्या पाल्यासह पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)**जिल्ह्यात दि.२५ डिसेंबर रोजी ख्रिसमस, ३१ डिसेंबर वर्षाचा शेवटचा दिवस आणि १ जानेवारी नुतन वर्ष स्वागत व भिमा कोरेगाव शौर्य दिवस या सण, उत्सव आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.१ जानेवारी २०२६ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. १८ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. १ जानेवारी २०२६ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# जालना शहरातील बाजारपेठा ख्रिसमस सणाच्या मुहूर्तावर खास रंगत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना शहरातील बाजारपेठा ख्रिसमस सणाच्या मुहूर्तावर खास रंगत आणि उत्साहाने सजल्या आहेत. प्रत्येक रस्त्यावर दुकाने रंगीबेरंगी दिव्यांनी आणि आकाशकंदीलांनी प्रकाशित दिसत आहेत. खिडक्यांवर, शॉपिंग मॉल्सच्या बाहेर आणि रस्त्यांच्या बाजूने विविध प्रकारची ख्रिसमस सजावट विक्रीसाठी ठेवण्यात आली आहे. लहान मुलांसाठी विविध आकारांचे ख्रिसमस ट्री, झगमगाटी दिवे, रंगीत बॅलन्स आणि चमकदार सजावटीच्या वस्तू उपलब्ध आहेत.



सांताक्लॉजच्या पुतळ्यांनी बाजारपेठेत खास आकर्षण निर्माण केले आहे. लोक त्याच्यासमोर फोटो काढत आहेत, तर काही लोक गिफ्ट वस्तूंची खरेदी करत आहेत. रस्त्यांवर रंगीबेरंगी फीत्या, झालर, आणि चमकदार बल्बांनी सजावट केली गेली आहे. गोंधळ आणि गर्दी असूनही वातावरण उत्साहाने भारलेले आहे, ज्यामुळे प्रत्येक भेट देणाऱ्याला ख्रिसमसचा आनंद अनुभवायला मिळत आहे.

छाया मजहर सौदागर यांनी विशेषतः लहान मुलांसाठी सांताक्लॉज आणि ख्रिसमस ट्रीच्या पुतळ्यांच्या भोवती आकर्षक प्रदर्शन सजवले आहे. या प्रदर्शनामुळे फक्त खरेदी करणाऱ्यांना नाही तर पर्यटकांना सुद्धा ख्रिसमसचा रंग अनुभवायला मिळतो आहे. बाजारपेठेतून सुगंधीत पदार्थ, ख्रिसमस मिठाई आणि गिफ्ट आयटम्ससुद्धा उपलब्ध आहेत, ज्यामुळे खरेदीचा अनुभव आणखी आनंददायी बनतो आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813